# ।। पंढरीची वारी ।।



भिवरेचे ठाण, भक्तीसी उधाण ।
ध्यानी मनी जाण, पांडुरंग ।।१।।
भक्तीचे तरंग, आभाळी ते रंग ।
सर्वत्र श्रीरंग, दाटोनिया ।।२।।
विठ्ठलाचा संग, विस्मृत ते दंग ।
गाताती अभंग, वारकरी ।।३।।
पंढरीची वारी, मना दे उभारी ।
पर्वणी ती न्यारी, कृष्णदासा ।।४।।

*–*–*

साजिरे गोजिरे, ब्रह्म ते वीटे रे ।
भिवरेचे तीरे, निश्चल गा ।।१।।
लावण्य पुतळा, जरी हो सावळा ।
हृदयासी सकळा, व्यापितसे ।।२।।
भक्तभावासी हा, आसुसला पहा ।
देव पंढरी हा, विठ्ठल गा ।।३।।
विठ्ठल विठ्ठल, मृदुंग नी टाळ ।
मंद मंद चाल, भक्तमेळा ।।४।।
सावळयासी हास्य, मंद ते मुखास ।
चाले सावकाश, कृष्णदास ।।५।।

*–*–*

विठ्ठल विठ्ठल, गाऊया विठ्ठल
नाचूया विठ्ठल, गर्जूया विठ्ठल ।।१।।
गर्जतसे टाळ, विठ्ठल विठ्ठल ।
संगे बोले बोल, वीणा ही विठ्ठल ।।२।।
प्रेमाचे केवळ, बोल हे विठ्ठल ।
विटेसी विठ्ठल, त्याला येई डोल ।।३।।
भक्तीचा सखोल, होतसे हा खेळ ।
वाजवीतो टाळ, कृष्णदास ।।४।।

*–*–*

अनादि अनंत, विटेवरी शांत ।
पंढरी तिष्ठत, भक्तांलागी ।।१।।
निर्गुण अक्रिय, दृग्गोचर होय ।
उतावीळ हृदय, भक्तभेटी ।।२।।
कटीवरी हात, विटेवरी ताठ ।
अक्रिय दावित, असे मी गा ।।३।।
ताराया आवडी, उडी घे तातडी ।
ऐसी तया गोडी, भक्तकाजा ।।४।।
द्वारकेचा राजा, करीतसे ये जा ।
पंढरीसी मजा, कृष्णदासा ।।५।।

*–*–*

पंढरीचा लळा, भक्तांसी आगळा ।
विठू हा सावळा, पहायासी ।।१।।
पंढरीसी दाटी, जाहली अलोटी ।
विठ्ठलाचे भेटी, भक्तमेळा ।।२।।
राम कृष्ण हरी, जयजयकारी ।
दुमली पंढरी, भिवरेसी ।।३।।
सावळयाचे वर्म, भावभक्ति मर्म ।
भागवत धर्म, महाराष्ट्री ।।४।।
वाळवंटी गाता, उभवी पताका ।
हर्ष होय निका, सावळयासी ।।५।।
मेघ हे सावळे, रूप ते सावळे ।
कृष्णदास डोळे, पाणावले ।।६।।
*-*-*

आला भक्तमेळा, हर्षला सावळा ।
विटेवरी काळा, सद्गदित ।।१।।
वर्षाकाठी नित्य, भेटीसी हा येत ।
नाही चुकवीत, वारीसी या ।।२।।
मागणे ते नाही, पाही रखुमाई ।
उतावीळ बाही, क्षेम द्याया ।।३।।
ऐसिया भक्तांसी, उभा मी विटेसी ।
शीण ना मजसी, युगायुगी ।।४।।
पहा गा तू उगी, राहुनिया जागी ।
सोहळा हा जगी, अनुपम ।।५।।
विटेवरी दिठी, देवभक्तां मिठी ।
मावळली सृष्टी, कृष्णदासा ।।६।।
*-*-*

सद्गुरूची दृष्टि, कृपेची हो वृष्टि ।
विठ्ठलाची भेटी, भाग्यवंता ।।१।।
संतांचा हो संग, विठू नामी दंग ।
मनी प्रेमरंग, दुणावत ।।२।।
विठू खुणावत, यावे पंढरीत ।
बाहू हे स्फुरत, क्षेमालागी ।।३।।
विठूपायी मिठी, जीवभावा तुटी ।
पावला संतुष्टी, कृष्णदास ।।४।।
*-*-*

सावळा ध्यानात, सावळा मनात ।
सावळा चित्तात, व्यापोनिया ।।१।।
सावळ्याची ओढ, प्रेम ते अजोड ।
पंढरीचे वेड, भक्तांलागी ।।२।।
सावळे श्रीमुख, पाहताचि सुख ।
लगबग देख, राऊळासी ।।३।।
सावळा कवेत, कवटाळी तेथ ।
होय आनंदित, कृष्णदास ।।४।।
*-*-*

टाळघोष मंद, भक्तीचा सुगंध ।
पंढरी हो धुंद, आज दिनी ।।१।।
भक्ति चंद्रभागा, दुथडी वाहे गा ।
भिजवी भक्तांगा, अंतर्बाह्य ।।२।।
भावाचा तो गंध, दाटलासे मंद ।
गाभारी हो धुंद, भक्तदेव ।।३।।
विठू हासे मंद, कैसे केले धुंद ।
लाविलासे छंद, कृष्णदासा ।।४।।
*-*-*



आनंद परीस, विठू पंढरीस ।
स्पर्शिता तो खास, आनंद गा ।।१।।
आनंदाची मूर्ती, असे ती गा क्षिती ।
खूण ही निश्चिती, मनी धरी ।।२।।
विठ्ठलाचा संग, आनंद अभंग ।
आनंदी हो दंग, भक्त सारे ।।३।।
ऐसा आनंदाचा, हाट भरे साचा ।
दिन आषाढीचा, एकादशी ।।४।।
वृष्टि आषाढीची, वृष्टि आनंदाची ।
न्हातसे नित्यचि, कृष्णदास ।।५।।

*-*-*

अदृश्य हा भाव, दृश्य करी देव ।
विटेवरी ठेव, भक्तांची ती ।।१।।
निर्गुण सगुण, साकार होऊन ।
पंढरीये जाण, उभा ठेला ।।२।।
दर्शनी विठ्ठल, हृदयकमळ ।
विरह प्रबळ, टाहो फोडी ।।३।।
आसवांच्या धारा, विटेच्या गाभारा ।
रुक्मिणीच्या वरा, पाहताचि ।।४।।
देव भक्त लोप, झाले एकरूप ।
पांडुरंग बाप, कृष्णदास ।।५।।

*-*-*



दिसे घनीभूत, रूप गाभाऱ्यात ।
सावळा अनंत, नीलवर्ण ।।१।।
ब्रह्मकाय घन, चैतन्य ते घन ।
थबके तत्क्षण, तन मन ।।२।।
स्वानंद पाझरे, देखिता गोजिरे ।
लावण्य न सरे, दृष्टीपुढे ।।३।।
देव उभा मूक, भक्त झाला मूक ।
कृपेची ती फेक, कृष्णदासा ।।४।।

**।। विठ्ठल ।। विठ्ठल ।। विठ्ठल ।। विठ्ठल ।।**

आषाढी एकादशी – २० जुलै २०२१